## दुसरी ट्रेन मुंबईत दाखल; लवकरच चाचण्याही घेणार

# मेट्रो-३ नववर्षात प्रवाशांच्या सेवेत!



मुंबई, ता. ३० : नवीन वर्षात कुलाबा-वांद्रे-सीप्झ या 'मेट्रो-३' मार्गावर पहिल्या टप्प्यात आरे ते बीकेसी स्थानकादरम्यान मेट्रो धावणार आहे. या मार्गासाठी आज दुसऱ्या ट्रेनचे सर्व आठ डबे मुंबईत दाखल झाले असून, लवकरच एकत्र करून त्यांची चाचणी घेतली जाणार आहे; तर पहिल्या ट्रेनने १ हजार ५०० किलोमीटरहून अधिक अंतराच्या चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. या प्रकल्पाच्या कामाने गती घेतली असून, २०२३ मध्ये प्रकल्पाचा पहिला टप्पा सेवेत आणण्याचे लक्ष्य मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) ठेवले आहे.

मेट्रो-३ साठी आरेमध्ये कारशेड बनविण्याच्या कामालाही गती आली आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात आरे ते बीकेसी दरम्यान मेट्रो सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी पहिली ट्रेन मुंबईत यापूर्वीच दाखल झाली असून, तिच्या विविध चाचण्या सुरू आहेत. तर गुरुवारी (ता. २९) आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील ऑल्स्टॉम प्लांटमध्ये तयार झालेले प्रत्येकी ४२ टन वजनाचे हे सर्व ८ डबे आंध्र प्रदेशातून १ हजार ४०० किलोमीटर अंतर पार करत मुंबईत दाखल झाले आहेत.

## भुयारी मार्गाचे १०० टक्के काम पूर्ण

एमएमआरसीने २०२२ या वर्षात प्रकल्पाचे अनेक उल्लेखनीय टप्पे गाठले. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी ५४.५ किलोमीटर अप आणि डाउन मार्गाचे संपूर्ण भूयारीकरणाचे काम पूर्ण केले. १७ टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) आणि १ हजार ७०० कामगारांच्या सहाय्याने ३३.५ किलोमीटर लांबीचे भुयारी मार्गाचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे, असे एमएमआरसीचे संचालक (प्रकल्प) एस. के. गुप्ता यांनी सांगितले. या कामासाठी एकूण २, ८६, ००० घनमीटर काँक्रीट आणि २९,५०० मेट्रिक टन स्टीलचा वापर करण्यात आला असून, रूळ टाकण्याचे कामही ५० टक्के पूर्ण झाले आहे, अशीही माहिती गुप्ता यांनी दिली.

## इतर कामेही जोमात

मेट्रो-३ प्रकल्पाची स्टॅटिक आणि डायनॅमिक अशा विविध चाचण्यांसह ट्रेनच्या इतर चाचण्या नियमितपणे सुरू आहेत. ओव्हरहेड कॉन्टॅक्ट सिस्टीमचे (ओसीएस) ५३ टक्के; तर वीजजोडणी प्रक्रिया ८८ टक्के पूर्ण झाली आहे. या व्यतिरिक्त १०५ सरकते जीने (एस्केलेटर), १९ उद्वाहक (लिफ्ट), १० प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि १२ प्रवासी माहिती डिस्प्ले सिस्टीम विविध स्थानकांवर बसवण्यात आल्या आहेत, अशी माहिती एमएमआरसीचे संचालक (प्रणाली) ए. ए. भट्ट यांनी दिली.